## DISTRICT & SESSION COURT/JMFC COURT, ICHALKARANJI

## CIVIL CASE FILING FORM

| Case Type Regular Suit | Reg. ~~Appeal~~ C.S. No. /2026 |
|---|---|

PLAINTIFF/APPELLANT/APPLICANT DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Name | रघुवीरनाथ रामगोंडा पाटील | | | | |
| Father/Mother/Husband | रामगोंडा शिवा पाटील | | | | |
| Address | [illegible], ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | | | | |
| Sex | Male ✓ | Female | Age 40 | Caste | हिंदु-लिंगायत |
| Nationality If other Mentioned | Indian भारतीय | | Occupation शेती | | |
| E-mail Address | | Phone No. Mobile No. 9027729279 | | Fax No. | |
| Subject | | | | | |
| Advocate Code | | Advocate Name :- Shafik S. Mujawar | | | |
| Adv. Phone No. | | Advocate Mobile No. :- B. S. L., LL. B. (Spl.) Advocate. TARDAL, Dist. Kolhapur. | | | |

DEFENDANT/RESPONDENT/NON APPLICANT DETAILS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Name | शामगोंडा [illegible]गोंडा पाटील | | | | | |
| Father/Mother/Husband | [illegible]गोंडा [illegible]गोंडा पाटील | | | | | |
| Address | [illegible], [illegible] ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | | | | | |
| Sex | Male ✓ | Female | Age | 76 | Caste | हिंदु-लिंगायत |
| Nationality If other Mentioned:- | Indian:- भारतीय | | Occupation शेती | | | |
| E-Mail Address | Phone No. Mobile No. | | Fax No. | | | |
| Subject | | | | | | |
| Advocate Code | Advocate Name :- | | | | | |
| Adv.Phone No. | Advocate Mobile No.:- | | | | | |

LOWER COURT DETAILS

| | | | |
|---|---|---|---|
| Court Name | | | |
| Case No. | | Decision Date | |

MAIN MATTER DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Case Type | | Case No. | | Year | |

FOR OFFICE USE ONLY

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Objection Redressal Date | / /20 | Objection Compliance Date | | | / /20 |
| Registration No. | | Registration Date | / / 20 | Listing Date | / /20 |
| Court Allottes | | | Allocation Date | | / /20 |

Adv. Shafik S. Mujawar
MAH 2029/2000
Mo.No: 9422418144
Main Road, Tardal

Exh.1/B

दै.र.नं. रे.क.नं. 47 /2026

ता. /02/2026

# मे. दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी

## यांचे कोर्टात...

ORDER
Issue summons to defendants as per Order VIII Rule 1 C.P.C.

Sd/-
4th Jt.C.J.J.D.
Ichalkaranji.
17/12/2026

1) **श्री. अष्टविनायक रायगोंडा पाटील,**
व.व. 40, धंदा- शेती,
रा. राम मंदिरजवळ, तारदाळ,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

2) **बाबू खानगोंडा पाटील (मयत वारस)**

अ) **श्री. बसगोंडा बाबू पाटील,**
व.व. 83, धंदा- शेती,
रा. गावभाग, तारदाळ,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**वादी**

?।/2/26
सहाय्यक अधीक्षक

| | | |
|---|---|---|
| ब) | **श्री. बाळगोंडा बाबू पाटील,**<br>व.व. 74, धंदा– शेती,<br>रा. गावभाग, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | |
| क) | **श्री. आप्पासाहेब बाबू पाटील,**<br>व.व. 70, धंदा– शेती,<br>रा. गावभाग, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | वादी |

**विरुद्ध**

| | | |
|---|---|---|
| 1) | **श्री. शामगोंडा म्हादगोंडा पाटील,**<br>व.व. 76, धंदा– शेती,<br>रा. गावभाग, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | |
| 2) | **श्री. संतोष दत्तात्रय पाटील,**<br>व.व. 44, धंदा– शेती व नोकरी,<br>रा. गावभाग, पाटील गल्ली, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | प्रतिवादी |
| 3) | **श्री. सदाशिव दत्तात्रय पाटील,**<br>व.व. 37, धंदा– शेती व नोकरी,<br>रा. गावभाग, पाटील गल्ली, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | |

.../1/2026
सहाय्यक अधीक्षक

4) **शालन रायगोंडा पाटील,**

व.व. 70, धंदा– शेती व घरकाम,

रा. राम मंदिरजवळ, तारदाळ,

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

5) **कलावती दगडू बनसवडे,**

व.व. 49, धंदा– शेती व घरकाम,

रा. पाटील मळा, वैतागवाडी, हातकणंगले,

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**प्रतिवादी**

6) **ललिता मलगोंडा पाटील,**

व.व. 45, धंदा– शेती व घरकाम,

रा. धरनवाडी, राजापूर,

ता.शिरोळ, जि. कोल्हापूर

7) **सविता उदय कोरे,**

व.व. 43, धंदा– शेती व घरकाम,

रा. 21/441, जवाहरनगर, इचलकरंजी,

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट 38 प्रमाणे**

**दावा सरस–निरस वाटपाचा**

**दावेची आकारणी रक्कम रु.** 2650 /– **व**

**ज्युरिसडिक्शन रक्कम रु.** 2650/–

2/2/26

सहाय्यक अधीक्षक

**यातील वादी यांचा दावा असा की,**

1) **मिळकतीचे वर्णन–**

जिल्हा व तुकडी कोल्हापूर, तालुका हातकणंगले, मा. सह दुय्यम निबंधकसो, वर्ग 2, इचलकरंजी यांचे अधिकार क्षेत्रातील **मौजे तारदाळ** येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे–

अ) **क.ग.नं. 1134** क्षेत्र हे. 0.86 आर., पो.ख. हे. 0.05 आर., एकूण क्षेत्र हे. 0.91 आर., आकार रु. 5.75 पैसेची बागायत शेतजमिन मिळकत यांसी चतु:सिमा–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | – | ओढा |
| पश्चिमेस | – | क.ग.नं. 1133 ची मिळकत |
| दक्षिणेस | – | बाळगोंडा गणपती पाटील यांची मिळकत |
| उत्तरेस | – | तमदलगे गावची हद्द |

ब) **क.ग.नं. 964** क्षेत्र हे. 0.02 आर., आकार रु. 0.20 पैसे यापैकी वादी व प्रतिवाद यांचे हिस्सेचे क्षेत्र हे. 0–00.50 आर., आकार रु. 0.05 पैसेची स्मशानभूमीची समाईक शेत मिळकत

येणेप्रमाणे वर कलम 1 (अ) व (ब) मध्ये नमूद चतु:सिमेतील मिळकती. त्यातील तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरी हक्कासह सर्व यासच यापुढे सदर दावेचे कारणाकरिता ''**दावा मिळकती**'' असे संबोधले आहे.

1.12.26
सहाय्यक अधीक्षक

2) वर कलम 1 मध्ये नमूद केलेल्या मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार श्री. खानगोंडा बाबाजी पाटील यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची होती. श्री. खानगोंडा पाटील हे ता. 24/11/1932 इ. रोजी मयत झाले असून त्यांची पत्नी कृष्णाबाई पाटील या मयत झालेल्या आहेत. त्यांचे मृत्यू पश्चात त्यांची तीन मुले अनुक्रमे म्हादगोंडा, बाबू, शंकर असे सरळ, कायदेशीर व जवळचे वारस होते. म्हादगोंडा, बाबू, शंकर पाटील यांचे पश्चात वादी व प्रतिवादी असे सरळ, जवळचे व कायदेशीर वारस होते व आहेत. त्याप्रमाणे यातील वादी व प्रतिवादी यांची सदर दावा मिळकतीमध्ये आजअखेर शांततामय कब्जे वहिवाट होती व आहे. त्याप्रमाणे एकत्र कुटूंब पुढारी म्हणून मयत बाबू व शंकर यांचेकरीता व स्वत:करीता म्हणून म्हादगोंडा खानगोंडा पाटील यांचे नावची नोंद 7/12 पत्रकी झालेली होती. त्यांचे पश्चात केवळ प्रतिवादी नं. 1 ते 3 यांचे नावची नोंद 7/12 पत्रकी झालेली आहे. परंतु, प्रत्यक्षात सदर दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची खानगोंडा यांचे पश्चात वारस नात्याने मालकी वहिवाट आलेली आहे. त्याप्रमाणे 7/12 पत्रकी वादी यांचे पुर्वहक्कदार यांचे नावाची नोंद कसणाऱ्याच्या सदरी होती व ऑनलाईन 7/12 झालेनंतर सदरच्या नोंदी दर्शविणारी प्रणाली उपलब्ध नसलेने 7/12 पत्रकी कसणाऱ्याच्या सदरी वादी यांचे नावाची नोंद दिसून येत नाही.

सहाय्यक अधीक्षक

3) यातील वादी व प्रतिवादी यांची कारणापुरती वंशावळ खालीलप्रमाणे

- खानगोंडा (मयत) (मुळ पुरुष) — कृष्णाबाई (मयत)
  - म्हादगोंडा (मयत 25/06/97) — रत्नाबाई (मयत 25/08/81)
    - दत्तात्रय (मयत 14/07/91) — मंगल (मयत 25/10/91)
      - संतोष (प्र.वादीनं. 2)
      - सदाशिव (प्र.वादीनं. 3)
    - शामगोंडा (प्र.वादी नं. 1)
  - बाबू (मयत 08/02/83) — हीराबाई (मयत 19/08/08)
    - बसगोंडा (वादी नं. 2अ)
    - बाळगोंडा (वादी नं. 2ब)
    - आप्पासाहेब (वादी नं. 2क)
  - शंकर (मयत 05/02/65) — चंपाबाई (मयत 10/12/76)
    - रायगोंडा (मयत 05/02/13) — शालन (प्र.वादी नं. 4)
      - अष्टविनायक (वादी नं. 1)
      - कलावती (प्र.वादी नं. 5)
      - ललिता (प्र.वादी नं. 6)
      - सविता (प्र.वादी नं. 7)

सहाय्यक अधीक्षक

येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची वंशावळ अशी.

4) सदर मिळकतीबाबत कोणताही निर्णय घेणेचा झालेस सदर मिळकती या केवळ प्रतिवादी यांचे नांवे 7/12 पत्रकी मालक कोष्टकी नोंद असलेने वादी यांना सोसायटीचे पिक कर्ज काढणे, शासकीय योजनेतून लाभ घेणे तसेच शेतजमिन सुधारणा करुन पोत वाढविणेकरीता आवश्यक ते बदल करणे त्याचप्रमाणे घर बांधकामाकरीता व इतर अनुषंगीक कारणाकरीता कर्ज काढणेचे झालेस प्रतिवादी यांची प्रत्येकवेळी संमती घेतले खेरीज कोणतीही कामे करता येत नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे मिळकतीमध्ये रितसर वाटणी करुन देणेबाबत विचारणा केली होती. त्यावेळी प्रतिवादी यांनी, ''जमिन कोठे जाणार आहे, थोडे दिवस थांबा, आपण रितसर वाटणी करु'' असे सांगितले. वादी हे प्रतिवादी यांचे शब्दावर विश्वास ठेवून आज ना उद्या रितसर वाटणी होईल अशी आशा बाळगून होते. त्यानंतर वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे जादाच तगादा लावलेनंतर यातील प्रतिवादी यांनी वादी यांचे लाभात ता. 01/02/2020 इ. रोजी नोटराईज्ड समझोता करारपत्र लिहून देऊन वाद मिळकतीमधील वादी नं. 1 यांना क्षेत्र हे. 0-28.66 आर.ची चतु:सिमेतील मिळकत कायमपणे समझोता वाटणीपत्राने दिलेली आहे. त्याचप्रमाणे वाद मिळकतीपैकी क्षेत्र हे. 0-28.66 आर.ची मिळकत वादी नं. 2 ते 3 यांना कायमपणे समझोता वाटणीपत्राने दिलेली आहे. याप्रमाणे यातील वादी यांची वर नमूद मिळकतीमध्ये कब्जा वहिवाट आहे.

सहाय्यक अधीक्षक

5) सदर समझोता वाटणी करारपत्राद्वारे वादींचे नावची नोंद दावा मिळकतीपैकी वर नमूद केलेले क्षेत्र रजि. करुन देणेबाबत वारंवार प्रतिवादी यांचेकडे विचारणा केली असता प्रतिवादी यांनी आजअखेर ''आज करु, उद्या करु'' असे म्हणून टाळाटाळ केलेली आहे. आजअखेर कोणत्याही प्रकारचे सरस-निरस मानाने रजिस्टर अथवा मे. कोर्टातून वाटप झालेले नव्हते व नाही. दावा मिळकतीमध्ये वादींचा अविभक्त हिस्सा असून तो तुटक होऊन स्वतंत्रपपणे वादींचे कब्जे वहिवाटीस मिळणे जरुरीचे आहे.

6) यातील प्रतिवादी नं. 1 यांच्या बहिणी व प्रतिवादी नं. 2 व 3 यांच्या आत्या यांचा दावा मिळकतीमधील हिस्सा अबाधित ठेवून प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. त्यांचे विरुद्ध वादी यांनी कोणत्याही प्रकारची मागणी केलेली नाही. त्यामुळे त्यांना प्रस्तुत कामी पक्षकार केलेले नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. 4 या वादी नं.1 यांच्या आई व प्रतिवादी नं. 5 ते 7 या वादी नं. 1 यांच्या बहिणी आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. 4 ते 7 यांनी हिंदू वारसा कायद्याप्रमाणे रायगोंडा यांचे पश्चात त्यांना प्राप्त झालेला हक्क व अधिकार वादी नं. 1 यांचे लाभात यापुर्वीच तोंडी सोडून दिलेला आहे. त्याबाबत काही तांत्रिक अडचण राहू नये म्हणून त्यांना सदर कामी फॉर्मल पक्षकार केलेले आहे. त्यांचे विरुद्ध वादी यांनी कोणतीही दाद मागणी केलेली नाही.

7) वादी यांचा प्रेमळ व भोळसट स्वभावाचा गैरफायदा घेऊन आजतागायत वादी यांचा दावा मिळकतीमध्ये कायद्याप्रमाणे येणारा हक्क व हिस्सा देणेस प्रतिवादी यांनी टाळाटाळ केली आहे. तद्नंतर वादी यांनी ता.

11/2/26
सहाय्यक अधीक्षक

02/02/2026 इ. रोजी प्रतिवादी यांची भेट घेऊन वर नमूद मिळकतीचे समझोता करारपत्राप्रमाणे अगर सरस-निरस मानाने विभागणी करुन रजिदस्त दस्ताद्वारे क्षेत्र देणेची मागणी केली. मात्र, प्रतिवादी यांनी वादी यांना कायद्याप्रमाणे येणारा हिस्सा अथवा समझोता वाटणीपत्राद्वारे आलेले क्षेत्र देणेची कोणतीही तसदी घेतली नाही. यावरुन प्रतिवादी हे वर कलम 1 मध्ये नमूद हिस्सा सरळ मार्गाने देणेस तयार नसलेचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कायद्याप्रमाणे येणारा हिस्सा अथवा समझोता करारपत्राद्वारे झालेल्या क्षेत्राचे मालक असलेचे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता सदर दावा दाखल करणे भाग पडले आहे.

8) **दावेस कारण-**

यातील वादी यांनी वेळोवेळी प्रतिवादी यांचेकडे दावा मिळकती मधील हिस्सा स्वतंत्रपणे तुटक करुन देणेबाबत विनंती केली व शेवटी ता. 02/02/2026 इ. रोजी वाटणी करुन देणेची विनंती केली त्यावेळी व तद्नंतर प्रतिवादी यांनी वाटणी करुन देणेस चालढकल चालविली त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी घडत आहे.

9) **दावेचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| रु. | 640/- | दावा मिळकत 1 (अ) ही शेतजमिन असून त्यापैकी वादी यांचे हिस्सेचे क्षेत्र हे. 0-57.32 आर. याची एकूण आकारणी रु. 3.20 पैसे इतकी असून त्याचे 200 पट आकारणी केली ती सदरी. |

11/2/26
सहाय्यक अधीक्षक

| | |
|---|---|
| रु. 10/- | दावा मिळकत 1 (ब) ही स्मशानभूमी शेतमिळकत असून त्यापैकी वादी व प्रतिवादी यांचे हिस्सेचे क्षेत्राची आकारणी रु. 0.05 पैसे इतकी असून त्याचे 200 पट आकारणी केली ती सदरी. |
| रु. 1,000/- | दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी वादी यांना क्षेत्र हे. 0-57.32 आर. ची मिळकत समझोता वाटणी करारपत्राने मालकी देऊ केली असलेचे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता ठराविक आकारणी केली ती सदरी. |
| रु. 1,000/- | यातील प्रतिवादी नं. 4 ते 7 यांनी त्यांचा हक्क व अधिकार वादी नं.1 यांचे लाभात सोडून दिले असलेचे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता आकारणी केली ती सदरी. |
| **रु. 2,650/-** | **एकूण रक्कम** |

सदर दावेची आकारणी रक्कम रु. 2,650/- करुन त्यावर महाराष्ट्र कोर्ट फी स्टॅम्प ॲक्ट 6 (4) व अन्य तरतुदीनुसार होणारा आवश्यक तो कोर्ट फी जोडला आहे.

10) **ज्युरिसडिक्शन-**

यातील वादी व प्रतिवादी हे मे. कोर्टाचे स्थळसिमेत राहत असून वर नमूद मिळकत ही मे. कोर्टाचे अधिकार क्षेत्रात येत असलेने सदरचा

1/2/26
सहाय्यक अधीक्षक

दावा मे. कोर्टांना चालविणेचा अधिकार आहे व न्याय निर्णय देणेचा अधिकार आहे. त्यामुळे सदरचा दावा मे. कोर्ट मजकूरी दाखल केलेला आहे.

11) सदर दावा मुदतीत असून सदर मिळकती संदर्भात यातील वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान अन्य कोर्टात प्रस्तुत स्वरुपाचा वाद प्रलंबीत नाही.

12) प्रस्तुत दावा मिळकतीबाबत वादी यांना प्रतिवादी यांचेकडून कोणत्याही प्रकारची कॅव्हिएटची नोटीस प्राप्त झालेली नाही.

13) **सबब, वादी यांची विनंती की,**

अ) यातील वादींचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब) यातील वादी यांचा दावा मिळकती मधील 2/3 अगर समझोता वाटणी करारपत्राने आलेले क्षेत्र हे. 0–57.32 आर.ची मिळकत तुटक होऊन वादी यांचे कब्जात मिळणेबाबत आदेश व्हावा.

क) दावा शेतजमिन मिळकतीचे वाटप मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचेमार्फत अगर ते नेमतील त्या अधिकाऱ्यांमार्फत करणेबाबत आदेश व्हावा.

ड) जरुर ते न्यायाचे सर्व हुकूम याचकामी वादीचे बाजूने व्हावेत.

इ) जरुर तर दावा दुरुस्त करु तरी तशी परवानगी असावी.

येणेप्रमाणे असे.

सोबत वकीलपत्र, कागद यादी त्याप्रमाणे कागद, पत्ता मेमो,व प्रतिवादीकरीता नकला असे कागदपत्रे आहेत.

ठिकाण– इचलकरंजी

मे.जा.व्हावे

ता.११ /02/2026

.................................

11/2/26

सहाय्यक अधीक्षक

बसगोंडा बाबू पाटील

रायगोंडा बाबू पाटील

..................................

तयार व दाखल

Adv. Shafik S. Mujawar
MAH 2029/2000
Mo.No: 9422418144
Main Road, Tardal

ॲड. एस.एस. मुजावर

## प्रतिज्ञा

आम्ही यातील वादी नं. 1 ते 2 (क) आज मुक्काम इचलकरंजी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, आम्ही सदर कामी वादी असून प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. सदर दावेतील सर्व मजकूर आमचे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. सही

ता. 11 /02/2026

बसगोंडा बाबू पाटील

रायगोंडा बाबू पाटील

..................................

..................................

## ॲफिडेव्हिट

सत्यप्रतिज्ञेवर माझे नांव **श्री. अष्टविनायक रायगोंडा पाटील,** व.व. 40, धंदा- शेती, रा. राम मंदिरजवळ, तारदाळ, ता. हातकणंगले,

11/2/26
सहाय्यक अधीक्षक

जि. कोल्हापूर आज मुक्काम इचलकरंजी स्वत:करीता व वादी नं. 2 (अ) ते (क) करीता सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट लिहून देतो की, वर नमूद दावेतील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून लिहून दिले ॲफिडेव्हीट सही.

ता. 11/02/2026

मी ॲफिडेव्हिट करणार यास ओळखतो ..................

ॲड. एस.एस. मुजावर

## प्रतिज्ञा

मी, ॲफिडेव्हिट करणार **श्री. अष्टविनायक रायगोंडा पाटील,** व.व. 40, धंदा– शेती, रा. राम मंदिरजवळ, तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर आज मुक्काम इचलकरंजी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमूद दावेतील व ॲफिडेव्हिटमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

सही

ता. 11/02/2026 ..................

श्री./श्रीमती अष्टविनायक रायगोंडा पाटिल
वय 40 रा. तारदाळ
यांनी न्यायालयासमोर गांभीर्यपूर्वक सत्य प्रतिज्ञा
कथन केली. वास्तव त्यांची ओळख
श्री./सौ. एस. एस. मुजावर
वकील यांनी दिली आहे. त्याकरिता
अभिसाक्षीची स्वाक्षरी या समक्ष केली आहे.
दिनांक 11/2/2026

11/2/26
सहा. अधीक्षक